# नागपूर सुधार प्रन्यास

(www.nitnagpur.org)

(महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिनस्थातील स्थानिक नियोजन प्राधिकरण)

मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर – 440001

फोन नं. 0712-2531431 फॅक्स नं. 0712-2540187


## जाहिरात

नागपूर सुधार प्रन्यासमध्ये खालील नमुद केल्यानुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | किमान शैक्षणिक अर्हता / आवश्यक अनुभव |
|---|---|---|---|
| 1. | भुमापक/सर्व्हेअर/ परीनिरिक्षक/शिरस्तेदार | 02 | शासनाच्या भूमी अभिलेख, नगर भूमापन कार्यालयात भूमापक तथा तालुका निरिक्षक, जमिनीचे मोजमाप/सर्व्हे करण्याचा तत्सम पदावर काम केल्याचा पुरेसा अनुभव. |

1) अर्जदार हा नगर भूमापन अधिकारी क्र. 1, 2 व 3, नागपूर यांच्या कार्यालयातून सेवानिवृत्त झालेला असावा.

2) वयोमर्यादा 65 वर्षापर्यंत.

3) अर्जदाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी चालू/प्रलंबित तथा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

4) कर्मचारी सेवानिवृत्त काळिपत्रीमध्ये नमुद पदाच्या कामाचा अनुभवी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

सदर नेमणूकीचा कालावधी प्रथमत: 11 महिन्यांचा राहील. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण–2015 / प्र. क्र. 100/13 दि. 17/12/2016 तसेच शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण–2715/प्र.क्र.100/13 दि. 21/02/2018 व दि. 08/09/2023 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करार पध्दतीवरील नेमणूकीच्या वेळी महागाई भत्तासह मिळत असलेल्या मुळनिवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्तासह मिळणाऱ्या एककमे ऐवढी रक्कम मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल आणि एकदा निश्चित करण्यात आलेले परिश्रमिक करार पध्दतीने नेमणूकीच्या कालावधीसाठी कायम राहील. तसेच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशबाबत / सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क राहणार नाहीत. आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या कमी/ अधिक करण्याचे तसेच नेमणूक रद्द करण्याचे अधिकार मा. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना राहतील.

वरील अर्हताप्राप्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज आस्थापना विभाग, मुख्य कार्यालय, नागपूर सुधार प्रन्यास सदर, नागपूर–440 001 यांचेकडे दि. 30/11/2023 पर्यंत पुराव्यासह सादर करावेत. या तारखेनंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच प्राप्त झालेल्या अर्जानुसार भुमापक/ सर्व्हेअर/ परीनिरिक्षक/ शिरस्तेदार या पदासंबंधाने अर्जदारांना मुलाखतीकरिता तारीख वेगळ्याने कळविण्यात येईल. अर्जदाराने अर्जासोबत अर्जदाराचा पासपोर्ट आकाराचा फोटो, आधार कार्ड, सेवानिवृत्तीच्यावेळचे वेतन, पीपीओ आदेशाची प्रत निवृत्तीवेतनाचे साक्षांकीत कागदपत्रे व कामाच्या अनुभवाचे सक्षम प्राधिकाऱ्याकडील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

टिप:– उपरोक्त जाहिरातामध्ये नमुद पदे कमी जास्त करण्याचे तथा आवश्यकतेनुसार नियुक्ती करण्याचे अधिकार राखीव ठेवलेले आहेत. याबाबतचा अंतिम निर्णय नासुप्रचा राहील. व सदर निर्णय अर्जदारास बंधनकारक राहील.

स्वा/–

महाव्यवस्थापक

नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

जाहिरात क्र. EO/48/2023-24

दिनांक 10.11.2023